

# देगलूर महाविद्यालयाचे विद्यार्थी डॉ.बबन जोगदंड यांना पीएच. डी. प्रदान

## आतापर्यंत मिळवल्या २५ पदव्या व पदविका

देगलूर(प्रतिनीधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी तथा यशदा, पुणे येथील अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने लोकप्रशासन या विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.

डॉ. बबन जोगदंड यांनी महाराष्ट्र राज्यातील अधिकारी वर्गात सर्वाधिक पदव्या व पदविका मिळवण्याचा बहुमानही मिळवला आहे. आतापर्यंत त्यांनी २५ विषयात पदवी, पदविका मिळवल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी ६ विषयात एम. ए. केले आहे. त्याचबरोबर एल. एलएमबीए,एम.एस्सी. (मानसशास्त्र)एम.एम.सी.जे. मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम अशा महत्त्वपूर्ण पदव्या प्राप्त केल्या आहेत. देगलूर महाविद्यालय देगलूर येथील लोकप्रशासन केंद्राचे विभाग प्रमुख संशोधक डॉ. बालाजी कतुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली ममहाराष्ट्राच्या लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदानफ्या विषयात संशोधन करून त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास प्रबंध सादर केला त्यांना ही दुसरी पीएच. डी. पदवी प्राप्त झाली आहे.

डॉ. बबन जोगदंड यांना शिक्षण घेण्याचा छंद आहे. ते गेल्या वीस वर्षापासून महाराष्ट्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या व महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था असलेल्या यशदा या संस्थेमध्ये अधिकारी पदावर कार्यरत आहेत. यशदाच्या लोकप्रिय असलेल्या मयशमंथनफ या मासिकाचे संपादकही आहेत.

राज्यशासनाच्या डॉ. आंबेडकर चरित्र प्रकाशन साधने समिती व बालभारतीचेही ते सदस्य आहेत. लोकप्रशासनफया विषयात त्यांनी पीएच. डी. ही पदवी प्राप्त केल्याबदल डॉ बबन जोगदंड व संशोधन मार्गदर्शक तथा लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ बी. आर. कतूरवार यांचे एकूण ९ विद्यार्थी पीएच. डी. पूर्ण केल्या बदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,

उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, , गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , पर्यवेक्षक संग्राम पाटील डॉ. संजय देवडे ,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner